**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २२/२०१६-१७/१५४ दिनांक: ०६-१०-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. २२/२०१६-२०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. काशिम इस्माईल मुजावर<br>मु. पो. कुंभारी (रा.प्रतापपूर)<br>ता. जत, जिल्हा. सांगली | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

१) तक्रारदार काशिम इस्माईल मुजावर रा. कुंभारी ता. जत. जि. सांगली यांनी शेती पंपासाठी वीज जोडणी मिळणेबद्दल दिनांक ०५-०१-२०१६ रोजी रु. ६१००/- वितरण कंपनीच्या संबंधित कार्यालयात भरुन अर्ज केला आणि त्यांचा ग्राहक क्र. २७०६८०००३२४३ असा आहे. त्यांना विहित मुदतीमध्ये वीज जोडणी न मिळाल्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवार कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार केली. तथापि सदर कक्षाने दि. ११-०८-२०१६ च्या आदेशाने तक्रारदार यांना प्रतिक्षा यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असे कळविल्याने प्रस्तुत अपिल दिनांक १६-०९-२०१६ रोजी या मंचाकडे दाखल केले आहे.

२) वि.प. तर्फे लेखी निवेदन दाखल करणेत आले असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी एका पोलची जरुरी आहे. तक्रारदार यांचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक ११९२ असा आहे. वि.प.असेही म्हणतात की, तक्रारदार यांना वीज जोडणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार देणेत येईल.

३) प्रस्तुत प्रकरणाची या मंचासमोर दि. ०५-१०-२०१६ रोजी सुनावणी घेणेत आली. तेव्हा तक्रारदार स्वत: वि.पं. तर्फे कार्यकारी अभियंता श्री दराडे व कनिष्ठ अभियंता श्री कुलकर्णी हजर होते. त्यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

४) तक्रारदार यांनी वीज जोडणी SOP प्रमाणे त्वरीत मिळावी अशी विनंती केली. त्यांनी कोणत्याही प्रकारची भरपाई सुनावणीचे वेळी मागितली नाही. वि.पं. तर्फे सांगणेत आले की, तक्रारदार यांच्या जागेलगत वीज जोडणी देणेचे काम सुरु होत असल्याने तक्रारदार यांना तीन महिन्यात जोडणी देणे शक्य होईल.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांची वीज जोडणी मिळणेबद्दलची विनंती मान्य करता येण्यासारखी आहे काय?
उत्तरः- होय.
(२) कोणता अंतिम आदेश?
उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी कृषि पंपासाठी वीज जोडणीचा अर्ज करुन रु. ६१००/- इतकी रक्कम दिनांक ०५-०१-२०१६ रोजी वितरण कंपनीकडे जमा केली याबाबत वाद नाही. तक्रारदार यांचा प्रतिक्षादीतील क्रमांक ११९२ असा आहे. तथापि नियमानुसार त्यांना तीन महिन्यात वीज जोडणी देणेत आली नाही. कथित विलंबाबद्दल कोणतीही भरपाई तक्रारदार यांनी तोंडी युक्तीवादाचे वेळी मंचासमोर मागणी केली नाही. वर परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेनुसार तक्रारदार यांना अंदाजे तीन महिन्याच्या कालावधीत वीज जोडणी देणे शक्य आहे. असे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणातील इतर गोष्टी बाबत टिप्पणी न करता सदरचे गा-हाणे अंशत:

मंजूर करणे योग्य ठरेल असे वाटते. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य हे तत्व योग्यच आहे. परंतु कृतिमानके नियमांचे पालनही करणे गरजेचे आहे.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश देणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार यांच्या शेती पंपासाठी नविन वीज जोडणी अर्जाची पूर्णपणे पूर्तता झाली असल्यास त्यांना नियमानुसार वीज जोडणी तीन महिन्यांमध्ये जानेवारी २०१७ पर्यन्त देणेत यावी असा वि.प. यांना आदेश देणेत येतो.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |